अर्धसाप्ताहिक

# ब्रम्हपुरी समाचार

संपादक अशोक भैया

RNI No. MAHMUL/2016/69789

Postal Regd. No. G2/47/CHD-283/2023-25

E-Mail ID : bramhapurisamachar@gmail.com

गुरूवार, दि. 04 जून 2026 | वर्ष 11 वे | अंक 43 वा | ब्रम्हपुरी | पाने 6 | किंमत 2 रूपये

## ब्रम्हपुरी नगर पालिकेत 'पतिराजांचा' सुळसुळाट

### लोकप्रतिनिधी महिला पण कारभार मात्र 'कारभाऱ्यांच्या' हाती, नगराध्यक्ष कॅबीनमध्ये ठिय्या

**या पतीराजांचा हैदोस केवळ वार्डापुरता मर्यादित नसून, त्यांनी थेट नगरपालिकेच्या मुख्य इमारतीवर आणि प्रशासनावरही कब्जा मिळवण्यास सुरुवात केली आहे. पालिकेत आपल्या कामानिमित्त येणाऱ्या नागरिकांच्या मते, या १२ महिला नगरसेविकांपैकी काही नगरसेविकांचे पती दररोज पालिकेत येऊन ठाण मांडून बसतात. चक्क नगराध्यक्षांच्या मुख्य कॅबीनमध्ये बसून पालिकेतील शासकीय कर्मचाऱ्यांना विविध कामांचे फर्मान सोडण्याचे धाडस हे पतीराज करत आहेत.**

ब्रम्हपुरी/का.प्र.

स्थानिक नगरपालिकेत सध्या जनतेने निवडून दिलेल्या महिला नगरसेविकांपेक्षा त्यांच्या पतीदेवांचाच वावर आणि रुबाब अधिक पाहायला मिळत आहे. पालिकेच्या कारभारात या 'पतीराजां'ची लुडबूड इतकी वाढली आहे की, जणू काही हेच अधिकृत नगरसेवक आहेत, अशा आविर्भावात ते वावरत आहेत. यामुळे पालिकेचा अधिकृत कारभार नेमका कोण चालवतंय? असा संतप्त सवाल आता




ब्रम्हपुरीतील सुज्ञ नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे.

ब्रम्हपुरी नगरपालिकेत सध्या काँग्रेसची एकहाती सत्ता असून नगराध्यक्षांसह एकूण २१ नगरसेवक काँग्रेस पक्षाचे आहेत. यामध्ये भाजप व राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) पक्षाचा प्रत्येकी एक नगरसेवक आहे. तसेच काँग्रेस पक्षाचे दोन स्वीकृत सदस्य आहेत. एकूण सदस्यसंख्येपैकी तब्बल १२ महिला नगरसेवक पालिकेत प्रतिनिधित्व करत आहेत. महिलांना राजकारणात आणि सत्तेत समान संधी मिळावी या उद्देशाने आरक्षण देण्यात आले असले, तरी ब्रम्हपुरी पालिकेत मात्र काही महिला नगरसेविकांचे पतीच संपूर्ण सत्तेचा रिमोट कंट्रोल हाती घेऊन बसल्याचे चित्र आहे.

नागरिकांनी दिलेल्या माहितीनुसार, अनेक महिला

(उर्वरित पान क्र. ६ वर)

## ५० टक्के मर्यादा ओलांडल्यास ओबीसींचे आरक्षण कमी करा

### ग्रामपंचायत निवडणुकीसाठी सुधारणा

ब्रम्हपुरी/का.प्र.

राज्यात पुढील काळात होणाऱ्या ग्रामपंचायत निवडणुकीत आरक्षण हे ५० टक्केच्या मर्यादित ठेवण्याचे आदेश राज्य निवडणूक आयोगाने सर्व जिल्हाधिकाऱ्यांना दिले. अनुसूचित जाती (एससी), अनुसूचित जमाती (एसटी) व नागरिकांचा मागास प्रवर्ग (ओबीसी) यांचे एकूण आरक्षण ५० टक्क्यांवर गेल्यास ओबीसीचे आरक्षण कमी करण्यात येणार असून यासाठी कायद्यात सुधारणा करण्यात आली आहे. यामुळे काही ग्रामपंचायतींमध्ये ओबीसींसाठी जागा आरक्षित राहणार नाही, अशी भीती व्यक्त केली जात आहे.

महापालिका, नगरपालिका, नगरपंचायत, जिल्हा परिषद, पंचायत समित्या व ग्रामपंचायतींच्या निवडणुका या राज्य निवडणूक आयोगामार्फत घेण्यात येतात. प्रभागरचना निश्चित करण्याचे अधिकार राज्य शासनाकडे आहेत, तर आरक्षण निश्चितीचे अधिकार निवडणूक आयोगाकडे आहेत. स्थानिक स्वराज्य संस्थांमधील आरक्षणाची टक्केवारी ५० वर गेल्याने सर्वोच्च न्यायालयाने ओबीसी आरक्षणच रद्द ठरवले होते. त्यामुळे जवळपास तीन, साडेतीन वर्षे निवडणुकाच झाल्या नाहीत. दरम्यानच्या काळात राज्य शासनाने कायद्यात सुधारणा करीत आरक्षण ओबीसींच्या २७ टक्के आरक्षणासह एकूण आरक्षण ५० टक्के ठेवण्याचा निर्णय घेतला. त्यानुसार सर्वोच्च न्यायालयाने आरक्षण पूर्ववत केले. परंतु महापालिका, नगरपालिका, नगरपंचायत व जिल्हा परिषदेच्या निवडणुकीत आरक्षण निश्चितीसाठी आयोगाने जुनीच पद्धत (एससी, एसटीचे आरक्षण निश्चित करून उर्वरित जागांमध्ये ओबीसींना २७टक्के आरक्षण देणाची) ठरवून दिली. त्यामुळे अनेक ठिकाणी आरक्षण ५० टक्क्यांवर गेले. परिणामी पुन्हा प्रकरण सर्वोच्च न्यायालयात गेले. आरक्षण ५० टक्क्यांवर गेल्याने ओबीसी सदस्यांवर टांगती तलवार लटकली आहे. यापासून बोध घेत आता राज्य निवडणूक आयोगाने ग्रामपंचायत निवडणुकीसाठी आरक्षण निश्चित करण्यासाठी सुधारित आणि स्पष्ट आदेश काढले. यानुसार आरक्षण हे ५० टक्केच्या मर्यादित ठेवायचे आहेत. एससी, एसटी व ओबीसींचे एकूण आरक्षण हे ५० टक्क्यांवर जात असल्यास ओबीसींच्या जागा कमी कराव्यात, असे स्पष्टपणे आयोगाच्या आदेशात नमूद केले आहे. यासाठी ग्रामपंचायत कायद्यात सुधारणा करण्यात आली आहे.

### जि.प.साठी सुधारणा का नाही?

**राज्य निवडणूक आयोगाने निश्चित केलेल्या पद्धतीने महापालिका, जिल्हा परिषद, नगरपंचायती आणि नगरपालिकांमधील आरक्षणाची टक्केवारी ५० वर गेल्यामुळे शासन व आयोगावर टीका झाली होती. यामुळे २० जिल्हा परिषदांच्या निवडणूक जाहीर होऊ शकल्या नाहीत. असे प्रकार टाळण्यासाठी आयोगाने ग्रामपंचायत निवडणुकीसाठी कायद्यात सुधारणा केली. हीच सुधारणा जिल्हा परिषदेसाठी का केली नाही, असा प्रश्न आता उपस्थित करण्यात येत आहे.**

**ब्रम्हपुरी समाचारच्या अंकाकरीता**

**www.bramhapurisamachar.com/bs**

**या ऑनलाईन साईटला भेट द्या**



## संपादकीय...

# विषारी व्यवस्थेचा घोट

पुणे आणि पिंपरी-चिंचवड परिसरात विषारी दारूमुळे १९ जणांचा मृत्यू होणे ही केवळ गुन्हेगारी घटना नाही; ती प्रशासनाच्या अपयशाची भयावह साक्ष आहे. दारूबंदी असलेल्या राज्यांमध्ये अशा घटना घडतात, असे एकेकाळी म्हटले जात असे. मात्र महाराष्ट्रासारख्या औद्योगिक आणि प्रगत राज्यातही गावठी दारूच्या अवैध साम्राज्याने इतके खोलवर पाय रोवले आहेत की, त्यातून एकाच वेळी १९ नागरिकांचा बळी जातो, ही बाब अधिक गंभीर आहे. या प्रकरणाचा तपास राज्य गुन्हे अन्वेषण विभागाकडे (सीआयडी) सोपविण्यात आला असून पाच स्वतंत्र पथके चौकशी करीत आहेत. मात्र या तपासातून केवळ आरोपींना शिक्षा होणे पुरेसे ठरणार नाही. या मृत्यूंना कारणीभूत ठरलेल्या संपूर्ण व्यवस्थेचा शोध घेणे अधिक आवश्यक आहे.

प्राथमिक तपासातून समोर आलेली माहिती धक्कादायक आहे. मुख्य सूत्रधार योगेश वानखेडे याने केवळ नफ्याच्या हव्यासापोटी मिथेनॉलसारखे घातक रसायन गावठी दारूमध्ये मिसळले. मिथेनॉलचे मानवी शरीरावर होणारे परिणाम सर्वज्ञात आहेत. अंधत्व, मेंदूवरील परिणाम आणि मृत्यू यासाठी ते कुप्रसिद्ध आहे. तरीही अधिक नशा निर्माण करून विक्री वाढविण्यासाठी त्याचा वापर करण्यात आला. यामागील मानसिकता केवळ गुन्हेगारी नाही, तर मानवी जीवनाविषयीची संपूर्ण संवेदनशून्यता दर्शवणारी आहे.

तथापि, या प्रकरणाकडे केवळ एका आरोपीच्या लोभाच्या कथेसारखे पाहणे चुकीचे ठरेल. कारण प्रश्न असा आहे की, गेली तीन वर्षे हा व्यवसाय सुरू असताना स्थानिक पोलिस, उत्पादन शुल्क विभाग आणि गुप्तचर यंत्रणांना याची कल्पना नव्हती का? गावठी दारूचे अड्डे हे जंगलात लपलेले नसतात. ते विशिष्ट वस्त्यांमध्ये, सर्वसामान्यांच्या नजरेसमोर चालतात. अशा ठिकाणी नियमित विक्री होत असताना प्रशासनाला त्याचा सुगावा लागला नाही, असे मानणे कठीण आहे. त्यामुळे या घटनेत केवळ दारू विक्रेत्यांची नव्हे, तर नियंत्रण यंत्रणांच्या कार्यक्षमतेचीही चौकशी होणे आवश्यक आहे.

यातील आणखी चिंताजनक बाब म्हणजे मिथेनॉलची उपलब्धता. तपासानुसार आरोपीने बनावट कारण सांगून रसायन मिळवले. औद्योगिक वापरासाठी असलेले हे रसायन कोणत्या प्रक्रियेतून, कोणत्या पडताळणीशिवाय आणि कोणत्या नियंत्रणाखाली विकले गेले. हा प्रश्न उपस्थित होतो. धोकादायक रसायनांच्या विक्री व वाहतुकीवर कठोर नियंत्रण असणे अपेक्षित असताना त्याचा वापर इतक्या सहजपणे विषारी दारू तयार करण्यासाठी होतो, ही बाब व्यवस्थेतील मोठी त्रुटी अधोरेखित करते.

या घटनेचा सामाजिक पैलूदेखील दुर्लक्षित करता येणार नाही. विषारी दारूमुळे मृत्युमुखी पडणारे बहुतेक लोक हे समाजातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतील असतात. स्वस्त नशेच्या शोधात ते गावठी दारूकडे वळतात. त्यामुळे अशा प्रत्येक दुर्घटनेत केवळ काही व्यक्तींचा मृत्यू होत नाही, तर अनेक कुटुंबांचा आधार हिरावला जातो. मागे राहतात त्या विधवा, अनाथ मुले आणि उद्ध्वस्त झालेली कुटुंबे. त्यामुळे हा प्रश्न केवळ कायदा-सुव्यवस्थेचा नसून सार्वजनिक आरोग्य आणि सामाजिक न्यायाचाही आहे. सीआयडीकडे तपास सोपविण्याचा निर्णय योग्य आहे. कारण स्थानिक यंत्रणांवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले असताना स्वतंत्र आणि व्यापक चौकशीची गरज होती, मात्र अशा चौकशा अनेकदा आरोपींपर्यंत पोहोचतात. परंतु, त्यांच्या मागील संरक्षणछत्रीपर्यंत पोहोचत नाहीत. यावेळी तसे होता कामा नये. गावठी दारूच्या अवैध व्यवसायाला राजकीय, आर्थिक किंवा प्रशासकीय पातळीवर कोणी संरक्षण दिले का, याचाही शोध घेतला गेला पाहिजे.

पुण्यातील या १९ मृत्यूंची खरी शोकांतिका एवढीच नाही की काही व्यक्तींनी विषारी दारू प्राशन केली. शोकांतिका ही आहे की, त्या दारूपर्यंत पोहोचण्याचा संपूर्ण मार्ग व्यवस्थेच्या नजरेसमोर तयार झाला आणि तो रोखण्यात यंत्रणा अपयशी ठरल्या. त्यामुळे या प्रकरणाचा तपास केवळ आरोपी शोधण्यासाठी नव्हे, तर व्यवस्थेतील विषारी छिद्रे उघड करण्यासाठी झाला पाहिजे. अन्यथा आताचे १९ मृत्यू उद्याच्या आणखी मोठ्या दुर्घटनेची केवळ नांदी ठरतील.

# डोंगे घाटात बुडून १०वीच्या विद्यार्थ्याचा दुर्दैवी मृत्यू

ब्रम्हपुरी/का.प्र.

शहरापासून हाकेच्या अंतरावर असलेल्या चांदगाव रोड जवळील (नाला) डोंगे घाट येथे मंगळवार, दिनांक २ जून २०२६ रोजी सकाळी एक अत्यंत हृदयद्रावक घटना घडली. मित्रांसोबत पोहण्यासाठी गेलेल्या एका १६ वर्षीय विद्यार्थ्याचा पाण्याचा अंदाज न आल्याने नाल्यात बुडून मृत्यू झाला. नैतिक अशोक शेंडे (वय १६ वर्ष, रा. जाणी वार्ड ब्रम्हपुरी) असे मृत विद्यार्थ्याचे नाव असून, तो स्थानिक ख्रिस्तानंद स्कूलचा इयत्ता दहावीचा विद्यार्थी होता. या घटनेमुळे ब्रम्हपुरी शहरात आणि परिसरात तीव्र हळहळ व्यक्त होत आहे.

प्राप्त माहितीनुसार, मृत नैतिक शेंडे हा वनविभागात मजूर म्हणून कार्यरत असलेले अशोक शेंडे यांचा मुलगा होता. नैतिक नेहमीप्रमाणे मंगळवारी सकाळी ६ वाजताच्या सुमारास ब्रम्हपुरी येथील क्रीडा संकुलात बास्केटबॉल खेळण्यासाठी गेला होता. बास्केटबॉल खेळून झाल्यानंतर नैतिक आणि त्याचे मित्र सौम्य अतुल ढोक (रा. सम्राट अशोक चौक, ब्रम्हपुरी) व जय योगेश राऊत (रा. नान्होरी) हे तिथे सकाळी ७:३० वाजताच्या सुमारास चांदगाव रोडवरील डोंगे घाटात अंघोळ करण्यासाठी गेले. घाटावर पोहोचल्यानंतर, 'मी



पहिले पाण्यात जातो, त्यानंतर तुम्ही या,' असे मित्रांना सांगून नैतिकने पाण्यात उडी घेतली. मात्र, डोंगे घाटावरील तो भाग अत्यंत खोलगट असल्याने नैतिकला पाण्याचा अंदाज आला नाही आणि तो खोल पाण्यात बुडू लागला.

नैतिक पाण्यात दिसेनासा झाल्यानंतर त्याचा मित्र सौम्य ढोक याने धावत जाऊन नैतिकचे वडील अशोक शेंडे यांना घटनेची माहिती दिली. मुलाचा मित्र धापा टाकत घरी पोहोचला आणि त्याने 'नैतिक पाण्यात बुडाला आहे, लवकर चला,' असे सांगताच शेंडे कुटुंबावर आभाळ कोसळले. वडिलांनी तात्काळ चांदगाव रोडवरील नाल्याकडे धाव घेतली. घटनेची माहिती वाऱ्यासारखी पसरताच चांदगाव रोडवरील डोंगे घाटावर नागरिकांनी प्रचंड गर्दी केली होती. स्थानिक नागरिक आणि काही पोहणाऱ्या तरुणांनी तातडीने पाण्यात उतरून नैतिकचा शोध सुरू केला. मात्र, दुर्दैवाने तोपर्यंत उशीर झाला होता आणि नैतिकचा पाण्यात बुडून मृत्यू झाला होता.

या घटनेची माहिती स्थानिक पोलीस प्रशासनाला देण्यात आली असून, पोलीस स्टेशन ब्रम्हपुरी येथे मृतकाचे वडील अशोक शेंडे यांच्या तोंडी रिपोर्टवरून नोंद करण्यात आली आहे. पोलीस पुढील कायदेशीर कार्यवाही करत आहेत. एका उमद्या आणि क्रीडाप्रेमी विद्यार्थ्याचा असा अकाली मृत्यू झाल्याने ख्रिस्तानंद शाळेसह संपूर्ण ब्रम्हपुरी शहरावर शोककळा पसरली आहे. उन्हाळ्याचे दिवस असल्याने आणि पावसाळ्याची चाहूल लागताना अनेक तरुण नदी, नाले किंवा घाटावर पोहण्यासाठी जात आहेत. पालकांनी आपल्या मुलांवर लक्ष ठेवावे आणि तरुणांनी पाण्याचा अंदाज नसलेल्या अज्ञात ठिकाणी पोहण्याचे धाडस करू नये, असे आवाहन प्रशासनातर्फे करण्यात येत आहे.

# कोसंबीच्या आग पिडीत कुटुंबांना शासनाने मदत करावी

## पालकमंत्री उईके यांचेकडे तनय देशकर यांची मागणी

ब्रम्हपुरी/का.प्र.

तालुक्यातील कोसंबी येथे झालेल्या भीषण आग दुर्घटनेत तीन घरे जळून खाक झाली असून



अनेक कुटुंबांचा संसार उद्ध्वस्त झाला आहे. या आगीत दोन गॅस सिलेंडरचा स्फोट झाल्याने आग अधिक भडकली आणि मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. या दुर्घटनेत पीडित कुटुंबांचे घरातील जीवनावश्यक वस्तू, कपडे, धान्य, रोख रक्कम तसेच संसारोपयोगी साहित्य पूर्णपणे जळून नष्ट झाले.

या गंभीर परिस्थितीचे गांभीर्य पाहून भाजपा युवा मोर्चाचे जिल्हा सरचिटणीस तनय देशकर यांनी राज्याचे आदिवासी विकास मंत्री तथा चंद्रपूर जिल्ह्याचे पालकमंत्री प्रा. अशोकजी उईके यांच्याकडे आगग्रस्त कुटुंबांच्या पुनर्वसनासाठी शासनामार्फत तातडीने आर्थिक मदत व आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्याची मागणी केली. तनय देशकर यांनी पीडित कुटुंबांची परिस्थिती पालकमंत्र्यांसमोर मांडत, निकुरे कुटुंबाला त्वरित मदत मिळणे आवश्यक असल्याचे सांगितले. या घटनेमुळे निकुरे कुटुंबांवर मोठे संकट कोसळले असून शासनाने संवेदनशीलतेने मदत करण्याची विनंती केली.

दरम्यान, पालकमंत्री प्रा. अशोकजी उईके यांनी संबंधित अधिकाऱ्यांशी संपर्क साधला व पीडित कुटुंबांना तातडीने मदत उपलब्ध करून देण्याचे निर्देश दिले आहेत.

## विनोदिनी

साधारण साठी- पासष्टीतले गृहस्थ दातांच्या दवाखान्यात आले...

गृहस्थ : 'मॅडम, माझे समोरचे दात ना एकदम व्यवस्थित करून द्या. हसल्यावर अगदी छान दिसायला हवेत. समोरचे दात नीट लावले की थोडा जवान दिसेन ना मी...'

डॉक्टर : हो.. हो.. काका नक्की छान करू आपण दात...

गृहस्थ : मॅडम, पण पंधरा तारखे अगोदर दात बसवून होतील ना...?

डॉक्टर : हो हो... घरात लग्न वगैरे आहे का?

गृहस्थ : नाही...

डॉक्टर : बरं, मग तुमचा वाढदिवस वगैरे?

गृहस्थ : नाही हो..

डॉक्टर : मग कुठे बाहेर फिरायला वगैरे जाणार आहात का?

गृहस्थ : नाही .. नाही

डॉक्टर : बरं मग इतकं कशासाठी...?

गृहस्थ : अहो मॅडम... आमच्या १०वीच्या बॅचचं १६ तारखेला रियुनियन आहे हो...!

# विनोद झोडगे यांच्या नेतृत्वातील 'घेरा डालो' आंदोलनाची अधिकाऱ्यांनी घेतली धास्ती

## आंदोलनापूर्वीच बैठकीचे लेखी निमंत्रण, २० जूनपर्यंत आंदोलन मागे



ब्रम्हपुरी/का.प्र.

गोसेखुर्द प्रकल्पासाठी जमिनी देऊनही हक्काच्या मोबदल्यासाठी वणवण भटकणाऱ्या शेतकऱ्यांच्या प्रश्नावर आता ठिणगी पडली आहे. 'शेतकऱ्यांचा प्रलंबित मोबदला त्वरित द्या आणि कालव्यांच्या दुरुस्तीतील प्रशासकीय दिरंगाई थांबवा, अन्यथा आपल्या कार्यालय समोर दिनांक २९ मे २०२६ रोजी विशाल धरणे व घेरा डालो तीव्र आंदोलन छेडले जाईल,' असा इशारा भारतीय कम्युनिस्ट पक्षाचे नेते कॉ. विनोद झोडगे पाटील यांनी दिला होता. सोमवार, २५ मे रोजी सायघाटा येथील गोसेखुर्द उजवा कालवा विभाग कार्यालयावर धडक देऊन मा.ठग मॅडम यांच्या मार्फत मुख्यमंत्री यांना निवेदन सादर करण्यात आले. मात्र या आंदोलनाची गोसेखुर्द प्रशासनाने गंभीर धास्ती घेत आंदोलनापूर्वीच कॉ. विनोद झोडगे यांना फोन करून बैठकीचे लेखी पत्र देत तातडीची सहविचार सभा शेतकऱ्यांसमवेत आयोजित करण्याची विनंती केली व बुधवारी सभा घेण्यात आली. या सभेत खालील विषयावर सविस्तर चर्चा करण्यात आली.

**भ्रष्टाचार आणि फसवणुकीचा गंभीर आरोप**

यावेळी कॉ. झोडगे पाटील यांनी प्रशासनाच्या अनास्थेवर कडक शब्दांत ताशेरे ओढले. १९८४ पासून सुरू असलेल्या या प्रकल्पात शेतकऱ्यांच्या जमिनी कवडीमोल दराने घेण्यात आल्या. आता 'वाढीव मोबदला' देण्याचे आमिष दाखवून शेतकऱ्यांकडून कागदपत्रे गोळा केली जात आहेत. या प्रक्रियेत प्रत्येक शेतकऱ्याचे १५ ते २० हजार रुपये खर्च झाले असून, ३०० रुपयांच्या नोटरीसाठी वकिलांमार्फत ३००० रुपये उकळले जात असल्याचा खळबळजनक आरोप त्यांनी केला. 'हा आर्थिक भ्रष्टाचार कोणाच्या आशीर्वादाने सुरू आहे?' असा संतप्त सवालही त्यांनी यावेळी उपस्थित केला. यावेळी मुख्य अभियंता संदीप जी हासे साहेब यांनी प्रशासनाचा कुठलाही वकील अधिकृत नसून शेतकऱ्याने त्याला परवडणाऱ्या वकिलाकडून वारसा नाचे सक्सेशन सर्टिफिकेट तसेच नोटरी लागणारे कागदपत्रे बनवून घेऊ शकतात. गोसेखुर्द प्रकल्प अंतर्गत असा कुठलाही वकील टाईप नसून शेतकऱ्यांनी अशी चुकीची माहिती देणाऱ्या कर्मचारी व अधिकाऱ्याचे नाव सांगावे त्यावर तात्काळ कारवाई करण्यात येईल अशी ग्वाही दिली. शिवाय गोसेखुर्द महामंडळाकडे आपण आतापर्यंत आलेल्या शेतकऱ्यांच्या वाढीव सानुग्रह निधीच्या प्रस्तवानुसार महामंडळाकडे ९ करोड २६ लाखाची डिमांड केलेली असून साधारणता १८५ हेक्टर बाधित शेतकऱ्यांना त्याचा लाभ निधी प्राप्त होताच दुसऱ्याच दिवशी शेतकऱ्यांच्या खात्यावर ताबडतोब वितरित करण्यात येणार असे आश्वासन दिले.

प्रशासनाने २० जून पर्यंत ठोस पावले उचलली नाहीत, तर २१ते २५ जून २०२६दरम्यान भारतीय कम्युनिस्ट पक्ष आणि शेतकऱ्यांच्या वतीने गोसेखुर्द उजवा कालवा विभाग सायगाटा या कार्यालयाला समोर विशाल धरणे व 'घेरा डालो' आंदोलन छेडण्यात येईल असा इशारा सर्व शेतकऱ्यांच्या संमतीने देण्यात आला. यावेळी ग्रामीण भागातील बरेचसे शेतकरी भर उन्हातही प्रामुख्याने उपस्थित झाले होते त्यामध्ये शंकर तलमले, कोमल राम ठाकरे, शिवराम दोनाडकर, नंदू ढोरे, धनंजय नागतोडे, परसराम नकाते, दिलीप सातपुते, वसंता झोडे, पांडुरंग झोडे, शामराव मेश्राम, गजानन घोरमोडे, पंढरी तुंबडे, विठ्ठल मेश्राम, पद्माकर रामटेके, दिनेश नाकाडे, संदीप बगमारे, खुशाल निकुरे, एकनाथ बोरकर, बाळकृष्ण नागोसे, भाऊराव मेश्राम, पुंडलिक पाटील झोडे, मधुकर राऊत, गोलू दर्वे, लोमेश मेश्राम, यशवंत राऊत, दिलीप कन्नाके, अनिल तोंडफोडे, दिलीप सातपुते आदींसह अन्य अनेक शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# ट्रॅक्टर ट्रॉली चोरणाऱ्या २४ वर्षीय आरोपीला अटक

ब्रम्हपुरी/का.प्र.

स्थानिक ब्रम्हपुरी पोलीस ठाण्याच्या हद्दीतील खेडमक्ता येथून चोरीला गेलेली ट्रॅक्टर ट्रॉली शोधून काढण्यात ब्रम्हपुरी पोलिसांना मोठे यश आले आहे. याप्रकरणी पोलिसांनी एका २४ वर्षीय आरोपीला अटक केली असून त्याच्याकडून चोरीचा मुद्देमाल जप्त केला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, फिर्यादी प्रज्वल महादेव सहारे (वय १७ वर्षे, रा. खेडमक्ता, ता. ब्रम्हपुरी, जि. चंद्रपूर) यांची ट्रॅक्टर ट्रॉली दिनांक २५ एप्रिल २०२६ रोजी अज्ञात इसमाने चोरून नेली होती. याप्रकरणी फिर्यादीने दिनांक २७ एप्रिल २०२६ रोजी ब्रम्हपुरी पोलीस ठाण्यात येऊन तोंडी तक्रार दाखल केली. प्रज्वल सहारे यांच्या रिपोर्टवरून पोलिसांनी अज्ञात चोराविरुद्ध भारतीय न्याय संहिता कलम ३०३ (२) अन्वये गुन्हा नोंदवून तपासात घेतला.

सदर गुन्ह्याचा तपास ब्रम्हपुरी पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक प्रमोद बानबले यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस हवालदार मुकेश गजबे हे करीत होते. तपास सुरू असतानाच, पोलीस हवालदार गजबे यांना त्यांच्या खाजगी बातमीदाराकडून विश्वासू माहिती मिळाली. या माहितीच्या आधारे पोलिसांनी संशयित आरोपी गितेश संतोष निशाने (वय २४ वर्षे, रा. खरबी, ता. ब्रम्हपुरी, जि. चंद्रपूर) याला ताब्यात घेऊन त्याची कसून चौकशी केली. पोलिसी खाक्या दाखवताच आरोपीने गुन्हा कबूल केला. पोलिसांनी आरोपी गितेश निशाने याच्याकडून चोरीस गेलेली ट्रॅक्टर ट्रॉली जप्त करून सदर गुन्ह्याचा यशस्वी उकल केला आहे. याप्रकरणी पुढील कायदेशीर तपास सुरू आहे.



# रश्मी पगाडे यांची ब्रम्हपुरी तालुका काँग्रेस सोशल मिडीया कार्याध्यक्षपदी नियुक्ती

ब्रम्हपुरी/का.प्र.

संघटन सृजन अभियानांतर्गत काँग्रेस पक्षाच्या संघटन विस्ताराला गती देण्यासाठी ब्रम्हपुरी तालुका काँग्रेस सोशल मीडिया विभागाच्या कार्याध्यक्षपदी रश्मी पगाडे यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच सोशल मीडिया विभागाचे प्रदेशाध्यक्ष ऋषीकेश पाटील यांच्या मान्यतेने ही नियुक्ती करण्यात आली. याबाबतचे नियुक्तीपत्र विधिमंडळ काँग्रेस पक्षनेते व आमदार विजयभाऊ वडेट्टीवार यांच्या हस्ते रश्मी पगाडे यांना प्रदान करण्यात आले.

काँग्रेस पक्षाच्या विचारधारा, धोरणे व जनहिताच्या उपक्रमांची माहिती सोशल मीडियाच्या माध्यमातून जनतेपर्यंत प्रभावीपणे पोहोचविण्यासाठी तसेच पक्ष संघटना अधिक बळकट करण्यासाठी रश्मी पगाडे यांची निवड करण्यात आली आहे. त्यांच्या नियुक्तीमुळे ब्रम्हपुरी तालुक्यातील काँग्रेसच्या सोशल मीडिया विभागाला अधिक बळकटी मिळेल, असा विश्वास पक्षाच्या पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केला. या नियुक्तीबद्दल त्यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

# सोंदरी अंगणवाडीतील ऑफ ग्रीड सोलर प्रणाली पूर्ववत करा

ब्रह्मपुरी/का.प्र.

ग्रामीण भागातील लहान मुलांचे आरोग्य संगोपन, पोषण आहार तसेच ० ते ६ वर्षे वयोगटातील बालकांमध्ये शिक्षणाची आवड निर्माण व्हावी या उद्देशाने शासनाने अंगणवाडी केंद्रांची स्थापना केली आहे. मात्र, सोंदरी परिसरातील अनेक अंगणवाडी केंद्रांमध्ये नियमित वीज जोडणी उपलब्ध नसल्याचे चित्र समोर आले आहे.

या केंद्रांमध्ये ऑफ-ग्रीड सोलर प्रणाली बसविण्यात आली होती. मात्र, ही प्रणाली मागील अंदाजे पाच ते सहा वर्षांपासून बंद अवस्थेत असल्याचे दिसून येत आहे. परिणामी, अंगणवाडी केंद्रांमध्ये पंखे, वीज दिवे तसेच इतर मूलभूत सुविधांचा अभाव निर्माण झाला आहे. वीजपुरवठा नसल्यामुळे लहान बालके, गर्भवती महिला तसेच अंगणवाडी सेविकांना मोठ्या प्रमाणात अडचणींचा सामना करावा लागत आहे. विशेषत: उन्हाळ्याच्या दिवसांमध्ये ही समस्या अधिक गंभीर बनत असून, सोंदरी परिसरातील अंगणवाडी केंद्रांमध्ये त्याचे परिणाम जाणवत आहेत. या पार्श्वभूमीवर बंद पडलेली ऑफ-ग्रीड सोलर प्रणाली तत्काळ दुरुस्त करून सुरू करण्यात यावी किंवा पर्यायी स्वरूपात नियमित वीज जोडणी उपलब्ध करून द्यावी, अशी मागणी परिसरातील नागरिकांकडून करण्यात येत आहे.

# इंधन दरवाढ, जनगणनेत ओबीसी कॉलम मागणीसाठी काँग्रेसचे आंदोलन

## आम. विजय वडेट्टीवार यांची प्रमुख उपस्थिती




ब्रम्हपुरी/का.प्र.

केंद्र शासनाने पेट्रोल व डिझेलच्या किमतीत केलेल्या वाढीच्या निषेधार्थ तसेच जनगणनेत ओबीसी समाजासाठी स्वतंत्र कॉलमचा समावेश करण्याच्या मागणीसाठी ब्रम्हपुरी शहर काँग्रेसच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे निदर्शने करण्यात आली. यानंतर उपविभागीय अधिकारी यांना विविध मागण्यांचे निवेदन सादर करण्यात आले.

केंद्र शासनाने मागील आठवड्यात पेट्रोल व डिझेलच्या किमतीत मोठी वाढ केल्याने सर्वसामान्य जनतेवर अतिरिक्त आर्थिक भार पडत असून महागाईत वाढ होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. तसेच अनेक ठिकाणी इंधनाची टंचाई जाणवत असून नागरिकांना आवश्यक प्रमाणात पेट्रोल व डिझेल उपलब्ध होत नसल्याचा आरोप काँग्रेसच्या वतीने करण्यात आला. याबाबत केंद्र व राज्य शासन दुर्लक्ष करीत असल्याचा आरोप करत मोदी सरकारच्या धोरणांचा तीव्र निषेध करण्यात आला. यावेळी आंदोलनकर्त्यांनी सरकारविरोधात जोरदार घोषणाबाजी केली.

राज्यभर सुरू असलेल्या जनगणनेत इतर मागासवर्गीय (ओबीसी) समाजासाठी स्वतंत्र कॉलम नसल्यामुळे या समाजाची अचूक लोकसंख्या व सामाजिक स्थितीची माहिती उपलब्ध होणार नाही, परिणामी ओबीसी समाजाचे मोठे नुकसान होण्याची शक्यता असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले. त्यामुळे जनगणनेत ओबीसींसाठी स्वतंत्र कॉलमचा समावेश करण्यात यावा, अशी मागणी उपविभागीय अधिकाऱ्यांमार्फत केंद्र शासनाकडे करण्यात आली.

यावेळी विधिमंडळ काँग्रेस पक्षनेते-आमदार विजय वडेट्टीवार, माजी प्राचार्य डॉ.नामदेव कोकोडे, तालुका काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष खेमराज तिडके, शहर काँग्रेस अध्यक्ष हितेंद्र राऊत, कृउबा सभापती प्रभाकर सेलोकर, नगराध्यक्ष योगेश मिसार, न.प.उपाध्यक्ष डॉ.नितीन उराडे, माजी जि.प.सदस्य डॉ.राजेश कांबळे, प्रदेश सचिव डॉ.थानेश्वर कायरकर यांच्यासह तालुका व शहर काँग्रेसचे पदाधिकारी, नगर परिषदेचे नगरसेवक-नगरसेविका, युवक काँग्रेस, महिला काँग्रेस, विविध फ्रंटल ऑर्गनायझेशन व सेलचे पदाधिकारी तसेच काँग्रेसचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. आंदोलनानंतर उपविभागीय अधिकाऱ्यांना निवेदन सादर करून शासनाने तातडीने सकारात्मक निर्णय घ्यावा, अशी मागणी करण्यात आली.

# सायबर सेल आणि ब्रम्हपुरी पोलीसांची मोठी कामगिरी

## गहाळ झालेले १५ मोबाईल मूळ मालकांना परत

ब्रह्मपुरी/का.प्र.

सध्याच्या डिजिटल युगात मोबाईल ही प्रत्येकाची अत्यंत महत्त्वाची गरज बनली आहे. अशातच मोबाईल हरवला किंवा गहाळ झाला की नागरिकांची मोठी अडचण होते. मात्र, ब्रह्मपुरी पोलीस स्टेशनने सायबर तंत्रज्ञानाचा कौतुकास्पद वापर करत ब्रह्मपुरी परिसरातून गहाळ झालेले तब्बल १५ मोबाईल शोधून काढण्यात यश मिळवले आहे. हे शोधून काढलेले मोबाईल फोन मूळ मालकांना पोलीस प्रशासनाच्या वतीने नुकतेच सुपुर्द करण्यात आले.




ब्रह्मपुरी पोलीस स्टेशन अंतर्गत येणाऱ्या परिसरातून गेल्या काही दिवसांत नागरिकांचे मोबाईल गहाळ झाल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्या होत्या. या तक्रारींची गंभीर दखल घेत, भारत सरकारच्या CEIR (Central Equipment Identity Register) पोर्टल आणि सायबर सेलच्या अत्याधुनिक तंत्रज्ञानाच्या माध्यमातून या हरवलेल्या मोबाईलचा शोध घेण्याची मोहीम राबवण्यात आली. तांत्रिक विश्लेषणाच्या आधारे पोलिसांनी एकापाठोपाठ एक अशा एकूण १५ मोबाईलचा माग काढला आणि ते जप्त केले. ब्रह्मपुरी पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक प्रमोद बानबले यांच्या मार्गदर्शनात आणि प्रमुख उपस्थितीत पोलीस स्टेशन परिसरात एका कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या प्रसंगी पोलीस निरीक्षक प्रमोद बानबले यांच्या हस्ते सर्व १५ मोबाईल धारकांना त्यांचे मोबाईल परत करण्यात आले.

या धडक कारवाईत सहाय्यक पोलीस निरीक्षक मनोज खडसे, पोहवा मुकेश गजबे, पोलीस अंमलदार निलेश तुमसरे, पोलीस अंमलदार स्वप्निल पळसपगार, पोलीस अंमलदार प्रवीण भिवगडे, पोलीस अंमलदार इरशाद खान, पोलीस अंमलदार वशिष्ठ रंगारी यांनी अत्यंत महत्त्वाची भूमिका बजावली.

# जीवन शिक्षण शिबीर उद्घाटन सोहळा



ब्रम्हपुरी/का.प्र.

रविवार, दिनांक ३१ मे २०२६ ला सायंकाळी चौगान, ता. ब्रम्हपुरी येथे जीवन शिक्षण सुसंस्कार शिबिर चे उद्घाटन पार पडले. शिबिराचे उद्घाटक म्हणून सुबोध दादा, संचालक भु वैकुंठ अड्याळ टेकडी यांचे हस्ते खोमराज तिडके यांचे अध्यक्षतेखाली पार पडले. प्रसंगी उपसरपंच अंकुश मातेरे, रेखाताई कार्याध्यक्ष अड्याळ टेकडी, किशोर पाटील तिडके, सेवमंडळाचे पदाधिकारी, आयुष आस्वले गुरुजी, प्रशिक्षक म्हणून पूजा-आरती दोनाडकर, गीत व समर्थ इत्यादी उपस्थित होते.

याप्रसंगी दीपप्रज्वलन, वंदनीय तुकडोजी महाराज व पू तुकाराम दादा यांचे प्रतिमा पूजन, मान्यवरांचे मार्गदर्शन झाले. मार्गदर्शन करताना सुबोध दादा यांनी सांगितले की अशा संस्कार शिबिरातूनच गावाचे आरोग्य, संस्कार, दिनचर्या, जीवनावश्यक शिक्षण, गाव संस्कृती, सहकार्य वृत्ती, मानवता, श्रम प्रतिष्ठा, गाव स्वावलंबन, सामुहिकता, इत्यादी गोष्टींची जोपासना होऊ शकते.

# चकबोथली येथे भव्य शैक्षणिक साहित्याचे वाटप

ब्रह्मपुरी/का.प्र.

'शिक्षण हेच खरे दान' हा सुविचार केवळ भिंतीवर न राहता तो प्रत्यक्ष कृतीत आणल्यास समाजाचा विकास कसा होतो, याचे एक आदर्श उदाहरण नुकतेच चकबोथली येथे पाहायला मिळाले. जनसेवा, शिक्षणप्रेम व सामाजिक कार्याची चिरंतर परंपरा जपणारे, परिसराचे मार्गदर्शक स्व. चक्रधर पालनदास दोनाडकर यांच्या जन्मदिवसाचे



औचित्य साधून ग्रामसभा भवन, चकबोथली येथे शालेय विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य व भेटवस्तूंचे भव्य वितरण करण्यात आले.

३० मे २०२६ रोजी आयोजित या कार्यक्रमात गावातील व परिसरातील गरजू विद्यार्थ्यांना नवीन शैक्षणिक वर्षाच्या पूर्वतयारीसाठी नोटबुक (वह्या) आणि एक्झाम पॅड चे वाटप करण्यात आले. हे साहित्य मिळताच विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर एक वेगळाच आनंद आणि उत्साह ओसंडून वाहत होता. या वस्तूंचे वितरण परिसरातील प्रतिष्ठित नागरिक आणि शिक्षणप्रेमी संतोष माकडे, गुलाब मातेरे सर, ज्ञानेश्वर काटलाम सर, अनिल मातेरे सर, प्रा. अंकुशजी मातेरे, कैलास माकडे सर, गावच्या सरपंच दुर्गा नखाते, पो.पा. ज्योती मैंद तथा मुख्याध्यापक गुरुनुले सर व जि.प सर्व शिक्षकवृंद यांच्या हस्ते अतिशय उत्साहात साजरा करण्यात आला.

उपस्थित मान्यवरांनी आपल्या मार्गदर्शनात, स्व. चक्रधर पालनदास दोनाडकर यांनी आयुष्यभर समाजोपयोगी कामांना प्राधान्य दिले. त्यांच्या पश्चातही हा सामाजिक कार्याचा वसा व वारसा दोनाडकर परिवाराने तितक्याच तत्परतेने पुढे चालवला आहे. त्यांच्या जन्मदिवशी विद्यार्थ्यांना मदत करून त्यांना खरीखुरी आणि भावपूर्ण श्रद्धांजली वाहण्यात आली. याप्रसंगी पालनदासजी दोनाडकर, सुरज दोनाडकर, लिन्मय दोनाडकर, नंदू दोनाडकर, आशिष दोनाडकर तथा समस्त दोनाडकर परिवार व मित्र परिवार प्रामुख्याने उपस्थित होते.

# धान खरेदी उद्दिष्ट वाटपात अधिकाऱ्यांकडून पक्षपाती कारभार

## अनेक खरेदी केंद्र बंद, शेतकऱ्यांमध्ये संतापाची भावना, विनोद झोडगे यांची चौकशीची मागणी

ब्रम्हपुरी/का.प्र.

रब्बी हंगामात आधारभूत किमतीने धान विक्रीसाठी शासनाने धान खरेदीचे उद्दिष्ट ठरवून दिले आहे. मात्र, जिल्हा पणन अधिकाऱ्यांनी केलेल्या पक्षपाती व चुकीच्या उद्दिष्ट वाटपामुळे ब्रम्हपुरी तालुक्यातील काही संस्थांवर अन्याय झाला आहे. या अन्यायी धोरणामुळे परिसरातील हजारो शेतकरी हमीभावापासून वंचित राहण्याची व धान कवडीमोल भावाने खासगी व्यापाऱ्यांना विकण्याची गंभीर परिस्थिती तालुक्यात शेतकऱ्यांवर निर्माण झाली आहे.

शासनाकडून धान उत्पादक जिल्ह्यांतील अ,ब वर्ग संस्थाना (विविध कार्यकारी सोसायट्यांना सहकारी संस्थांना) रब्बी हंगामासाठी धानाची खरेदी करण्याचे उद्दिष्ट दिले जाते. परंतु, पणन अधिकाऱ्यांनी काही मोजक्या आणि मर्जीतील संस्थांना जादा उद्दिष्ट वाटप केले, यामुळे शेतकऱ्यांना आपला धान दुसऱ्या केंद्रांवर नेणे किंवा थेट व्यापाऱ्यांच्या दारात नेऊन विकणे भाग पडत आहे. आर्थिक देवाण घेवाण करून उद्दिष्ट वाटप केल्याचा असा संशय व्यक्त करण्यात येत आहे.

काही संस्थांना जादा उद्दिष्ट दिल्याने त्या ठिकाणी धान खरेदी सुरू आहे. काही संस्थांना खरेदीचे धान उद्दिष्ट कमी दिल्याने लवकर संपले. त्यामुळे खरेदी केंद्र बंद झाली असल्याने नोंदणी असूनही धान पडून आहेत. तर काही संस्थांना खरेदी करण्यास बारदाना देतांना विलंब करण्यात येत आहे जिल्हा पणन अधिकाऱ्याच्या चुकीच्या नियोजनामुळे हजारो शेतकऱ्यांनी पोर्टलवर नोंदणी करूनही त्यांचा एक दाणाही खरेदी झालेला नाही.

**खरीप हंगामात काही शेतकर्यांचा हजारो क्विंटल धान काही संस्था कडे आहे. तो धान रब्बी हंगामात विकायचा असल्याने अशा संस्था सोबत आर्थिक व्यवहार करुन अधिकचे उद्दीष्ट देण्यात आले आहे. तसेच खरेदी केलेल्या शासकिय धानाचे डि.ओ देतांनाही मोठ्या प्रमाणात अनियमितता झाली आहे, काही संस्थांना बारदाना देण्यात अडचणी निर्माण करीत आहेत या सर्व प्रकाराची चौकशी झाल्यास मोठा गैरप्रकार उघडकीस येऊ शकतो.**

या प्रकाराची शेतकरी नेते विनोद झोडगे यांनी उद्दिष्ट वाटपाच्या चौकशीची तक्रार जिल्हाधिकारी यांच्याकडे तहसीलदार मार्फत दिलेल्या निवेदनातून केली आहे. जर पणन अधिकाऱ्यांनी त्वरित वाढीव उद्दिष्ट मंजूर करून सर्व नोंदणीकृत शेतकऱ्यांचा धान खरेदी केला नाही, तर तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा संतप्त शेतकरी व कॉम्रेड नेते विनोद झोडगे यांनी दिला आहे. निवेदन देताना झोडगे यांच्यासह माजी जिल्हा परिषद सदस्य शंकरदादा सातपुते, सामाजिक कार्यकर्ते अँड आशिष गोंडाने, शरद भानारकर, हळदा येथील सरपंच दौलत गरमळे, मधुकर राऊत आदी शेतकरी उपस्थित होते.

# पुडूच्चेरी येथील राष्ट्रीय बास्केटबॉल स्पर्धेत ब्रम्हपुरीच्या कन्येची सुवर्णभरारी

## नंदिनी प्रधान ठरली 'गोल्डन गर्ल'

ब्रह्मपुरी/का.प्र.

शैक्षणिक, सांस्कृतिक, क्रीडा आणि आरोग्य नगरी म्हणून संपूर्ण महाराष्ट्रात नावलौकिक असलेल्या ब्रह्मपुरी शहराच्या शिरपेचात मानाचा आणखी एक तुरा रोवला गेला आहे. येथील नागेश्वर नगर (आरमोरी रोड) परिसरातील रहिवासी माधव प्रधान यांची कन्या नंदिनी प्रधान हिने पुडुचेरी येथे आयोजित ७६ व्या जुनिअर नॅशनल बास्केटबॉल स्पर्धेत अप्रतिम कामगिरी करत सुवर्णपदक पटकावले आहे. तिच्या या ऐतिहासिक कामगिरीमुळे ब्रह्मपुरी शहराचे नाव थेट राष्ट्रीय स्तरावर गाजले आहे.

बास्केटबॉल असोसिएशन ऑफ इंडियाच्या वतीने पुडुचेरी या केंद्रशासित प्रदेशात ७६ व्या जुनिअर नॅशनल बास्केटबॉल स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या ऑल इंडिया लेव्हलच्या प्रतिष्ठेच्या स्पर्धेत भारतातील विविध राज्यांच्या बलाढ्य संघांनी आणि सर्वोत्तम खेळाडूंनी भाग घेतला होता. या अत्यंत चुरशीच्या स्पर्धेत नंदिनीने छत्तीसगडच्या जुनिअर संघातून खेळताना मैदानावर आपला सर्वोत्तम खेळ दाखवला आणि संघाला सुवर्णपदक मिळवून देण्यात मोलाची भूमिका बजावली.



नंदिनीला शालेय जीवनापासूनच क्रीडा क्षेत्राची, विशेषत: बास्केटबॉल खेळण्याची प्रचंड आवड होती. या आवडीचे रूपांतर दर्जेदार कौशल्यात करण्यासाठी ती छत्तीसगड येथील 'राजेश्वरराव कालवा सर्वज्ञ बास्केटबॉल अकॅडमी, राजनांदगाव' येथे उच्च दर्जाचे प्रशिक्षण घेत आहे. अकॅडमीचे संचालक राजेश्वरराव कालवा यांच्या अचूक मार्गदर्शनाखाली नंदिनीने कठोर सराव केला, ज्याचे फळ आज सुवर्णपदकाच्या रूपाने संपूर्ण देशासमोर आले आहे.

छत्तीसगड संघाचे प्रतिनिधित्व करत असतानाही, नंदिनीने आपल्या मूळ ब्रह्मपुरी शहराची आणि महाराष्ट्राची ओळख राष्ट्रीय स्तरावर पोहोचवली आहे. एका शहरातून जिद्दीच्या जोरावर देशात प्रथम क्रमांक पटकावणाऱ्या नंदिनीचे कौतुक केवळ ब्रह्मपुरी शहरातच नव्हे, तर नागपूरसह संपूर्ण विदर्भामध्ये होत आहे. सोशल मीडियापासून ते थेट घराघरांपर्यंत तिच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत असून, ती तरुण खेळाडूंसाठी एक मोठी प्रेरणा ठरली आहे. 'नंदिनीने मिळवलेले हे यश तिच्या कठोर परिश्रमाचे आणि क्रीडेप्रती असलेल्या निष्ठेचे प्रतीक आहे. तिने ब्रह्मपुरीचे नाव देशाच्या क्रीडा नकाशावर सुवर्णाक्षरांनी कोरले आहे.' असे मत ब्रह्मपुरीवासीय व क्रीडाप्रेमी यांनी व्यक्त केले.

**जल है तो कल है...**

# महाराष्ट्र इंस्टिट्यूट ऑफ फार्मसी येथे माजी विद्यार्थी स्नेहमिलन



ब्रम्हपुरी/का.प्र.

तालुक्यातील महाराष्ट्र इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी बेटाळा महाविद्यालयात दि. ३० मे २०२६ ला माजी विद्यार्थी (Alumni Meet) स्नेहमिलन सोहळ्याचे आयोजन करण्यात आले. या निमित्त प्रमुख पाहुणे म्हणून संस्थेचे अध्यक्ष देवेन्द्रजी पिसे, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.सचिन दुधे, अलुमनी असोसिएशन चे अध्यक्ष डॉ. श्री.अनुप बारसागडे, उपाध्यक्ष प्रा.छगन डोईजड, सचिव प्रा.पृथ्वीराज मेश्राम, उपसचिव प्रा.श्रीकांत महाजन, ट्रेझरर महेशजी मेश्राम तसेच सभासद भूपेशजी गोस्वामी इत्यादी अलुमनी कार्यकारिणी समिती सदस्य उपस्थित होते. शैक्षणिक सत्र २०१८ पासून ते २०२५ पर्यंत उत्तीर्ण विद्यार्थी बहुसंख्येने उपस्थित झाले.

उपस्थित माजी विद्यार्थ्यांनी आपल्या मनोगतात सांगितले की महाविद्यालयात असलेल्या आवश्यक सुविधा, पारंगत व अनुभवी प्राध्यापक यांचे सदैव लाभलेले अचूक मार्गदर्शन यामुळेच आम्ही उच्च शिक्षण घेण्यासाठी पात्र ठरलो आणि उत्तम पदावर कार्यरत आहेत. संस्थेचे अध्यक्ष देवेन्द्रजी पिसे विद्यार्थ्यांना आश्वासित केले. प्राचार्य डॉ. सचिन दुधे यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविकआणि माजी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाचे संचालन प्रा. पूजा घुटके यांनी केले तसेच आभार प्रदर्शन प्रा. देवाशीष भरणे यांनी केले.

**... QUOTES ...**

"There is nothing impossible to they who will try."

- Alexander the great

**चारोळी**

*आम्ही देशाला लुटतो*
*तुम्ही परस्परांना लुटा...*
*आम्ही 'जेब भरो' करतो,*
*तुम्ही 'जेल भरो' करा...*

★ रचनाकार : डॉ. राजन जयस्वाल ★

# शहरातील नाल्यांवरील फरश्यांची दुरूस्ती केव्हा?

ब्रम्हपुरी/का.प्र.

ब्रम्हपुरी नगरपरिषदेची निवडणुक होऊन आता सहा महिने झाले असतील. नगराध्यक्ष, नगरसेवक यांना आपापल्या पदांचा पदभार पण स्विकारला. ब्रम्हपुरी शहरात काही नाल्या, रस्ते अशी मोठी कामे होतांना दिसते परंतु नगरपरिषद प्रशासनाला गावातील लहान लहान किरकोळ कामे दिसत नसल्याचा आरोप येथील सामाजिक कार्यकर्ते राजू भागवत यांनी केला आहे.



ब्रम्हपुरी शहरातील अनेक नाल्यांवरील फरश्या, झाकण फुटलेले, तुटलेल्या अवस्थेत आहेत. ही झाकणे तुटतात कशी हा एक प्रश्न आहे, एक तार त्यात सळाखी नसतात किंवा सीमेंट चे प्रमाण कमी राहत असेल. परंतु या तुटलेल्या फरश्या वर नगरपरिषद प्रशासनाने लक्ष द्यायला पाहिजे कारण रात्रीच्या अंधारात, पावसाळ्यात या नालीत लहान मुले, माणसे सहज पडू शकतात.

असाच एक मोठा गड्डा महाराष्ट्र बँकेसमोर कितीतरी वर्षापासुन पडलेला आहे परंतु यांकडे नगरपालिकेचे बिलकुल लक्ष नाही. त्या बँकेत दिवसभरात शेकडो लोक येणे जाणे करतात, त्या गड्डयात कुणाचाही पाय घसरून पडू शकतात, पडले ही असेल व पुढेही पडतच राहणार. त्यांचे हात , पाय तुटले तर कोण जबाबदार राहील.

पावसाळ्याला सुरूवात होत असतांना अश्या या गड्डात एखादा लहान मुल नकळत पडून वाहत जाईल तेव्हा नगरपरिषद प्रशासनाचे डोळे उघडतील काय हा प्रश्न सामाजिक कार्यकर्ते राजू भागवत यांनी केला आहे व ही नाल्यावरील तुटलेली झाकणे पावसाळा सुरू होण्यापूर्वी दुरुस्त करावे, अशी मागणी केलेली आहे.

❁❁❁❁❁❁❁

# हळदा येथे अवैध दारूचा मोठा साठा जप्त

ब्रम्हपुरी/का.प्र.

अवैध दारू तस्करांविरोधात ब्रम्हपुरी पोलिसांनी धडक मोहीम उघडली असून, १ जून २०२६ च्या रात्री हळदा परिसरात एका निळ्या रंगाच्या फोर्ड फिगो कारमधून होणारी देशी दारूची चोरटी वाहतूक पकडण्यात पोलिसांना मोठे यश आले आहे. या धडक कारवाईत पोलिसांनी कारसह तब्बल ५,००,००० रुपये (पाच लाख) किमतीचा मुद्देमाल जप्त केला असून दोन आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.




गोपनीय माहितीनुसार, सोमवार दिनांक १ जून २०२६ रोजी रात्री १० वाजताच्या सुमारास हळदा येथील बस स्टॉपकडून गोशाळेजवळील गोसेखुर्द उपकालव्याच्या पाळीने एका कारमधून देशी दारूच्या पेट्या विक्रीसाठी नेल्या जाणार होत्या. या माहितीच्या आधारे ब्रम्हपुरी पोलीस स्टेशन अंतर्गत येत असलेल्या मेंडकी पोलीस चौकीच्या अंमलदारांनी तातडीने हळदा परिसरात सापळा रचून नाकाबंदी केली. नाकाबंदी दरम्यान संशयास्पद वाटणारी एक निळ्या रंगाची फोर्ड फिगो कार (क्रमांक: MH 31 DK 0647) पोलिसांनी थांबवली. कारची कसून झडती घेतली असता, पोलिसांना आतमध्ये देशी दारूचे ५० कागदी खोके आढळून आले. प्रत्येक खोक्यात ९० एम.एल. मापाच्या १०० नग 'रॉकेट संत्रा' देशी दारूच्या बाटल्या होत्या. अशा प्रकारे एकूण ५० खोक्यांमधून २ लाख रुपये किमतीच्या ५,००० दारूच्या बाटल्या आणि ३ लाख रुपये किमतीची फोर्ड फिगो कार, असा एकूण ५ लाख रुपयांचा मुद्देमाल पोलिसांनी जागीच जप्त केला. याप्रकरणी पोलिसांनी कार चालक अरुण उर्फ मारोती रामचंद्र लाडवे (वय ३६ वर्षे, रा. हळदा, ता. ब्रम्हपुरी) याला ताब्यात घेतले आहे. तसेच, या दारू साठ्याची मालकी असलेला त्याचा साथीदार हरबच्चन सिंग गुरुदीप सिंग टाक (वय ४० वर्षे, रा. हळदा, ता. ब्रम्हपुरी) या दोघांच्या विरुद्ध ब्रम्हपुरी पोलीस ठाण्यात अपराध क्रमांक ५०४/२०२६, महाराष्ट्र दारूबंदी अधिनियम कलम ६५(अ), ८३ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदर यशस्वी कारवाई चंद्रपूर जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक आयुष नोपानी, अप्पर पोलीस अधीक्षक ईश्वर कातकडे, ब्रम्हपुरी विभागाचे प्रभारी एसडीपीओ दिनकर ठोसरे आणि ठाणेदार प्रमोद बानबले यांच्या मार्गदर्शनात करण्यात आली. सपोनि मनोज खडसे यांच्या नेतृत्वाखाली पोलीस हवालदार रतन लेनगुरे, मिलिंद नैताम, मुकेश गजबे तसेच पोलीस अंमलदार अमोल लोनबले, अनिल आगासे, निलेश तुमसरे, स्वप्निल पळसपगार आणि इरशाद खान यांनी केली.









# ब्रम्हपुरी नगर पालिकेत 'पतिराजांचा...

(पान क्र. १ वरून)

नगरसेविका आपल्या वार्डात फिरण्याऐवजी त्यांचे पतीच वार्डात जाऊन नागरिकांच्या समस्या ऐकत आहेत. एवढ्यावरच न थांबता, आपणच नगरसेवक असल्यासारखे ते नागरिकांना विविध कामांची आश्वासनेही देत सुटले आहेत. त्यामुळे जनतेने मतदान नेमके कोणाला केले आणि कामे कोणाकडून करून घ्यायची, असा संभ्रम वार्डात निर्माण झाला आहे.

सर्वात संतापजनक बाब म्हणजे, कोणत्याही अधिकृत पदावर नसताना हे पतीराज नगरपालिकेत काम करणाऱ्या गरीब रोजंदारी कर्मचाऱ्यांना अपमानास्पद वागणूक देत आहेत. अनेकदा या कर्मचाऱ्यांना खालच्या पातळीवर जाऊन टोचून बोलले जाते, त्यांच्यावर विनाकारण रुबाब झाडला जातो. यामुळे पालिकेतील कर्मचाऱ्यांमध्येही आतल्या आत तीव्र असंतोष खदखदत आहे.

या सर्व प्रकारामुळे ब्रम्हपुरीतील नागरिकांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत असून, त्यांनी प्रशासनाला आणि सत्ताधाऱ्यांना काही रोखठोक प्रश्न उपस्थित केले आहेत. कुठल्याही अधिकृत पदावर नसताना या नगरसेविकांच्या पतींना नगरपालिकेत बसू देण्याचा आणि शासकीय कामात ढवळाढवळ करण्याचा अधिकार कोणी दिला? नगराध्यक्षांच्या कॅबीनचा वापर खाजगी दरबारासारखा का केला जात आहे? पालिकेतील रोजंदारी कर्मचाऱ्यांना खालच्या पातळीवर बोलण्याचा अधिकार या पतीराजांना कोणी दिला? महिला सक्षमीकरणाच्या गप्पा मारल्या जात असताना ब्रम्हपुरीत मात्र 'महिला पुढे आणि पती मागे' ऐवजी 'पती पुढे आणि महिला गायब' असेच चित्र पाहायला मिळत आहे. आता या वाढत्या लुडबुडीवर पालिकेचे प्रशासन किंवा वरिष्ठ नेते काही लगाम लावणार की 'पतीराजां'चा हा समांतर कारभार असाच सुरू राहणार, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.






Printed by Rajiv Pachpor published by Ashok Kisanlalji Bhaiya on behalf of Ashok Kisanlalji Bhaiya and printed at Aqua Process, Modi No.1, Sitabuldi, Nagpur and Published at Bramhapuri Samachar Office, Wadsa Road, Bramhapuri Editor Ashok Kisanlalji Bhaiya MAHMUL/2016/69789 Mob. 9422135404